*This Question Paper contains 8 printed pages.*

Seat No.: | | | | | | | |

Sl. No. : 102204

# 003(M)

**(March, 2019)**

***Time : 3 Hours]*** ***[Maximum Marks : 100***

सूचना :

1) या प्रश्नपत्रिकेचे पाच विभाग करण्यात आलेले आहेत.

2) प्रश्नांचे विकल्प आंतरिक आहेत.

3) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

4) लेखनसज्जता, भाषाशुद्धी आणि मौलिक लिखाणास गुणप्राधान्य असेल.

## विभाग -A ( पद्य )

■ **खालील प्रश्नांची हेतुलक्षी उत्तरे लिहा :** [4]

1) 'केशवाचे भेटीं लागलेंसे पिसें' हा अभंग कोणी लिहिला आहे?

2) कवी केशवसुत यांचे संपूर्ण नाव काय?

3) ' एक प्रकारची प्रार्थना' या काव्याचा साहित्य प्रकार कोणता?

4) 'उलगुलान' हा काव्यसंग्रह कोणी लिहिला?

■ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** [4]

5) सरोवरामध्ये कोण पोहत आहे?

6) कवी मानवास कोणाला भजावयास सांगत आहे?

7) कवीने याचना कशाला म्हटले आहे?

8) रुपयाची कोणती किंमत कवीला हवी होती?

■ **खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा :** [4]

9) कवीने श्रान्त पान्थस्थासाठी सराई का बांधली?

10) कविता महाजन यांनी आई–लेकराविषयी कोणता विचार मांडला आहे?

■ **खालील कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :** [8]

11) नल राजाने मुक्त केलेल्या राजहंसाने काय काय केले?

12) कवी आरती प्रभू यांना दिवसाचे ओझे का वाटत आहे?

13) "ग्रहावरचे हे लोक किती आहेत मागासलेले, अडाणी, अनभिज्ञ न् निरक्षर!" या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा.

## विभाग - B ( गद्य )

■ **खालील प्रश्नांची हेतुलक्षी उत्तरे लिहा :** [4]

14) 'पेशव्यांची बखर' या पाठाचे लेखक कोण?

15) 'शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचे उपाय' या पाठाचा साहित्य प्रकार कोणता?

16) 'महानिर्वाण' या नाटकाचे इंग्रजीत भाषांतर कोणी केले?

17) साधना आमटे यांचे आत्मचरित्र कोणत्या नावाने प्रसिद्ध झाले?

■ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** [4]

18) मुलाला भूक लागण्यासाठी आईने काय दिले?

19) दम्याचा ॲटॅक कोणाला आला होता?

20) तात्यांनी हादग्याच्या चित्राचा कागद कुणाच्या दुकानातून आणलेला असे?

21) बापूचा उर का दडपला?

■ **खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा :** [4]

22) नरेंद्रनाथांना काय शुद्ध थोतांड वाटत असे?

23) माहेरच्या धनाबद्दल आई काय म्हणाली असे लेखकाने सांगितले आहे?

■ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :** [8]

24) लेखकास साळवणीतील झोपेबाबत कोणते अनुभव आले?

25) माधवी मंदिरातल्या मूर्तीशी कोणते संभाषण करते?

26) हायरो राजाला कोणती शंका भेडसावत होती? त्याला त्या शंकेचे निरसन कसे हवे होते?

## विभाग - C ( व्याकरण )

■ **खालील वाक्यांचा पदक्रम योग्य क्रमात जुळवून वाक्ये पुन्हा लिहा :** **[ 2 ]**

27) जाऊन भूलोजीविषयी तात्यांकडे विचारले मी.

28) अंगठी परत ती आपण पेटीत ठेवू लाकडी.

■ **खालील समानार्थी शब्दांच्या जोड्या शोधून पुन्हा लिहा :** **[ 2 ]**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 29) | परिस्थिती | – | जल | – | सुवर्ण |
| 30) | पाणी | – | अवस्था | – | दामिनी |
| 31) | विद्युत | – | हेम | – | दशा |
| 32) | सोने | – | बिजली | – | उदक |

■ **खालील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधून पुन्हा लिहा :** **[ 2 ]**

| | | | |
|---|---|---|---|
| 33) | आरंभ | × | वार्धक्य |
| 34) | संयोग | × | निर्गुण |
| 35) | तारुण्य | × | वियोग |
| 36) | सगुण | × | अंत |

■ **खालील शब्दसमूहांसाठी एक-एक शब्द द्या :** **[ 2 ]**

37) कमी व मोजकेच बोलणारा –

38) एकाच काळात जगलेली माणसे –

39) न शोभणारे –

40) कोणताही उपाय बाकी नाही असे –

■ **खालील वाक्याचे कंसांतील सूचनेनुसार वाक्यात रूपांतर करा :** [1]

41) तुला एवढी मदत मी नाही करणारे का?
(होकारार्थी वाक्य करा)

■ **खालील वाक्याचे कंसांतील सूचनेनुसार वाक्यात रूपांतर करा :** [1]

42) तुम्ही गाणे म्हणा. तुम्ही गोष्ट सांगा.
(संयुक्त वाक्य करा)

■ **खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचा प्रकार सांगा :** [1]

43) वीरपुरुष

■ **खालील अलंकाराचे उदाहरण द्या :** [1]

44) उत्प्रेक्षा

■ **खालील वृत्ताचे उदाहरण देऊन लक्षणे सांगा :** [1]

45) लहान अभंग

■ **खालील वाक्यातील प्रयोग ओळखा :** [1]

46) कोणीही खोटे बोलू नये.

■ **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगा :** [1]

47) जीव गलबलून जाणे

48) तुंबडी भरणे

■ **खालील ग्रामीण शब्दांना प्रचलित मराठी शब्द द्या :** [1]

49) सम्दं

50) कवरच्या कवर

■ **खालील अशुद्ध शब्द शुद्ध करून लिहा :** [1]

51) पटर्वधण

52) कुश्ठरोगि

■ खाली दिलेल्या शब्दांमधील अर्थभेद लिहा : [1]

53) चिता – चिंता

■ खालील म्हणींचा अर्थ सांगा : [1]

54) घरोघरी मातीच्या चुली

55) ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी

■ खालील वाक्यात विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा : [1]

56) या गाण्यातला राम कोण तो डोंगरात कशाला गेला

## विभाग – D ( अर्थग्रहण )

■ खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : [5]

धन्य धन्य ही वंद्य मम मातृभू
बंधुता वाढवू एक राहू
अचल हे गिरि उभे वाहती आपदा
ही वने उपवने विविध बहु संपदा
गर्जती जलधि हे गगन वरती निळे
गातसे पवन हा गात पक्षी-कुले
धन्य ही धन्य ही मम मातृभू
मंत्र हा एकता सतत गाऊ
विविध भाषा तशा विविध या संस्कृती
मायभू वत्सला धर्म बहु नांदती
या इथे झुंजले वीर समरांगणी
संतजन नाचले भक्तिच्या अंगणी
धन्य ही धन्य मम मातृभू
सतत सेवाव्रती कष्ट साहू
ध्वज नभी डोलतो भूषवी ही धरा
सर्व समभाव हा आज येई घरा
सत्य शांतीसवे एकता वाढवी
सार्थ अभिमान हा नम्रता भूषवी
धन्य धन्य ही वंद्य मम मातृभू
पुत्र आम्ही तिचे पांग फेडू

– गोविंद केळकर

**प्रश्न :**

57) कवीला काय वंद्य आहे?

58) भारतभूमी ही निसर्गसंपन्न आहे हे कशावरून?

59) येथील संस्कृती, धर्म व नररत्ने यांचे वर्णन कवीने कसे केले आहे?

60) कोणत्या गुणांमुळे ही भूमी श्रेष्ठ झाली आहे?

61) 'पांग फेडणे' या वाक्प्रचाराचा अर्थ लिहा.

■ **खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** [5]

मृगजळ हा एक सृष्टीचमत्कार आहे. सरोवराचा वा जलसंचयाचा भास होऊन तृषार्त प्रवासी किंवा मृग तिकडे धावत जातात, पण तो भास असल्याने ते फसतात. वालुकामय प्रदेशात सूर्याच्या प्रखर उष्णतेने वाळवंट खूप तापते व भू-भागालगतची हवा तापून प्रसरण पावते. त्यामुळे हवेचे थर विरळ होऊन हलके होतात. त्यामानाने वरील थर थंड असल्याने त्यांची घनता खालच्या थरांपेक्षा जास्त असते. एखाद्या उंच झाडाच्या शेंड्यापासून निघणारे किरण घन थरातून खालच्या विरळ थरात येत असता त्यांचे व्यावर्तन होते. ते प्रवाशांच्या डोळ्यांत गेले म्हणजे डोळ्यांकडे येणाऱ्या किरणांच्या रेषेत झाडाचा शेंडा दिसतो, म्हणून झाडाची उलटी प्रतिमा पडते. तसेच हवेच्या खालवर हालचालींमुळे पाण्याच्या लाटांचा भास होतो. त्यामुळे तेथे मृगजळ आहे असे वाटते.

**प्रश्न :**

62) प्रवासी किंवा मृग वाळवंटात का फसतात?

63) भू-भागालगतची हवा तापल्याने काय होते?

64) झाडाची प्रतिमा उलटी का दिसते?

65) पाण्याच्या लाटांचा भास कसा होतो?

66) उताऱ्याला समर्पक शीर्षक द्या.

■ **खालील उताऱ्याचा एक तृतीयांश भागात सारांश लिहा व उताऱ्याला योग्य ते शीर्षक द्या :** [5]

67) खेळाकडे एकदा तंद्री लागली की भोवतालचे जग बुडाले म्हणून समजावे. एकदा मी खेळता खेळता कुटलेली सुपारी तपकीर म्हणून ओढल्याचे आठवते. एकदा तर

मी बुद्धिबळाच्या खेळात विडी म्हणून उंटच तोंडात धरून पेटवू लागलो होतो. पांडुतात्यांनी एकदा सबंध हत्ती सुपारी म्हणून तोंडात टाकला आणि तो दातांनी फुटेना म्हणून दुसरा हत्ती अडकित्याने कातरून गट्ट केला. त्यांना लवकरच प्रायश्चित्त म्हणून हत्तीरोग जडला हे सांगणे आवश्यक आहे. पण या सर्वांपेक्षाही गमतीचे वर्तन घडले ते बंडूनानांकडून. त्यांनी पिण्याकरिता म्हणून पाण्याचा पेला जवळ ठेवला होता आणि एक चिट्ठी पाठवायची म्हणून दौतही जवळ घेतली होती. परंतु सारे लक्ष खेळाकडे लागल्यामुळे त्यांनी चिट्ठी पाण्याने लिहून व घाईघाईने बंद करून पाठवून दिली आणि नंतर दौत तोंडास लावून तिच्यातील शाई गटागट पिऊन टाकली. शाई प्याल्यावर त्यांचे सगळे पांढरे केस काळेकुळकुळीत झाले आणि त्यांच्या अंगातून शाईसारखाच घाम जाऊ लागला.

■ **खालील परिच्छेदाचा योग्य क्रम लावून तो पुन्हा लिहा :** [5]

**68)** ''एकदा गड्या साळवणात तुझ्या झोपायचं. बघू कसं वाटतं ते.'' साळवणाचा ढीग अंगावर घेऊन झोपायचे ही कल्पनाच मला फार मोहक वाटली. मी म्हणालो, ''आबाच्या शेतात साळीचं पीक असे. मी अनेक वेळा त्याच्या रानात तो पाहिला होता. साळ काढून झाली सगळी की त्याच्या काडांचा ढीग रानात पडलेला असे. पण या ढिगाचा उपयोग झोपेसाठी होतो हे नवल मला ठाऊक नव्हते''.

## विभाग - E ( लेखन )

**69)** तुमच्या शाळेतील इयत्ता 12वीच्या निरोप समारंभाविषयी अहवाल लेखन करा. [5]

**70)** **खाली दिलेल्या मुद्यांच्या आधारे गोष्ट तयार करा व त्यास योग्य ते शीर्षक द्या.** [5]

एका गावी दुष्काळ — दयाळू शेतकरी — गरीब मुलांना भाकरी वाटणे — शेतकऱ्याकडून परीक्षा — लहान भाकर तयार करणे — प्रत्येक मुलाचा मोठ्या आकाराच्या भाकरीसाठी प्रयत्न — एका मुलाचे लहान भाकर उचलणे — घरी जाऊन भाकर मोडणे — भाकरीत सोन्याची मोहोर — मुलाच्या आई–वडिलांकडून मोहर परत करणे — शेतकऱ्याकडून मोहरा बक्षीस — बोध.

**किंवा**

■ **खालील कल्पनेचा विस्तार करा :**

''जया अंगी मोठेपण तया यातना कठीण''

■ **खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे 250 शब्दांत निबंध लिहा :** [10]

**71)** लोकशाही आणि निवडणुका :

भारत एक लोकशाही राष्ट्र — प्रतिनिधींची निवड अटळ म्हणून निवडणुका — निवडणुकांतील दोष व त्रुटी — निवडणूक आयुक्तांचे कार्य — निर्भय वातावरणातील निवडणुका आवश्यक.

**किंवा**

भ्रष्टाचाराचा भस्मासूर :

भ्रष्टाचार म्हणजे काय? — तो का माजतो? — समाजातील विविध प्रकारचा भ्रष्टाचार — प्रत्येकजण स्वार्थी व पैशामागे लागलेला — प्रामाणिकपणाला शून्य किंमत — कोणत्याही प्रकारे द्रव्यार्जन प्रमुख — राहणीमान — वाढत्या गरजा — परिस्थितीचा बळी — पिढीचे भवितव्य.

**किंवा**

करमणुकीची साधने बंद झाली तर :

करमणूक म्हणजे काय? — त्यासाठी विविध साधने — करमणूक का लागते? — कोणकोणते प्रकार — शारीरिक, मानसिक थकवा — साधने बंद तर काम अशक्य — हास्य हा स्थायीभाव — तणाव विसरणे अशक्य — कलाकारास जन्म नाही — स्थान नाही — संस्कृतिवर्धन नाही.

◆◆◆